## माझी वसुंधरा अभियान

- **योजनेचे नांव:** माझी वसुंधरा अभियान
- **योजनेचे माहिती:** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत नागरी व ग्रामीण क्षेत्रांसाठी राबविण्यात येणारा अनोखा एकात्मिक असा उपक्रम आहे. यामध्ये नैसर्गिक परिसंस्थांचे जतन व संरक्षण करण्यासाठी विविध उपयांची अंमलबजावणी करणे आणि वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक कृती उपक्रमांवर नागरिकांच्या सहभागास प्रोत्साहित करणे या बाबी समाविष्ट केल्या आहेत. या अभियानाची रचना कार्बन सीक्वेस्ट्रेशन, हरित वायूचे उत्सर्जन कमी करणे आणि नागरिकांमध्ये शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करणे या वातारणीय बदलाच्या तीन महत्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी करण्यात आली आली आहे.
- **योजनेची उदिष्टे :** 1.माझी वसुंधरा अभियान संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उदिष्टांशी संरेखित आहे कारण दोन्ही सर्वांगीण सामाजिक विकासाला संबोधित करतात.2.माझी वसुंधरा अभियान निसर्गाच्या पाचही घटकांवर (पंचमहाभूते( लक्ष केंद्रित करते. - भूमी, वायू, जल, अग्नी व आकाश. 3.निसर्गाच्या पाच घटकांना संबोधित करुन आणि नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन, माझी वसुंधरा अभियान शाश्वत विकास उदिष्टे साध्य करण्यासाठी योगदान देते.
- **योजनेचा कालावधी:** दिनांक 1 एप्रिल ते 31 मार्च

- **माझी वसुंधरा अभियान अंतर्गत दरमहा करावयाचे कामकाज**

**पंचतत्व - भूमी**

1. ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या प्रमाणाचे मासिक अहवाल तयार करणे.
2. निर्माण झालेल्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता कंपोस्ट पिट किंवा बायोगॅस केंद्राचा वापर करावा व त्याचे मासिक अहवाल तयार करणे.
3. निर्माण झालेल्या, विलगीकृत केलेल्या आणि प्रक्रिया केलेल्या सुक्या कचऱ्याच्या प्रमाणाचे मासिक अहवाल तयार करणे.
4. SUP (सिंगल युज प्लास्टिक( च्या वापरावर दंड वसूल केलेची लॉग बूक अहवाल तयार करणे व त्यात नोंदी ठेवणे.

**पंचतत्व - वायु.**

1. शेतातील उसाचे पाचट तसेच कृषी कचरा जाळण्यावर बंदी घालण्याचे आदेशाचे ग्रामसभेत/ मासिक सभेत ठराव घेणे.
2. उत्सवादरम्यान सार्वजनिक ठिकाणी परवानगी दिलेल्या वेळेच्या मर्यादेनंतर लाऊड स्पीकर वापरण्याकरीता दिलेल्या निर्बंधाच्या आदेशाची /सूचनेची प्रत संबंधितांना देणे व त्याचे काटेकोरपणे पालन करणेबाबत सुचित करणे.

**पंचतत्व - जल.**

1. पर्यावरण दूतांसह श्रमदान मोहिम राबवावी. त्यामध्ये विहिरीचे पुनर्जीवन करणे, जलस्त्रोतांची स्वच्छता करणे इ. उपक्रम राबविणे.

**पंचतत्व - अग्नि**

1. नूतनीकरण योग्य ऊर्जा स्त्रोत आणि शून्य कार्बन उत्सर्जनाबाबत जन जागृती उपक्रम राबविणे.
2. ई वाहन आणि सोलर ऑन ग्रीड सिस्टीमचा प्रचार आणि प्रसार करणे.

**पंचतत्व - आकाश**

1. ज्या ज्या ग्रामपंचायतींनी अद्याप सोशल मिडिया फेसबुक, इंस्टाग्राम आणि युटयुब- वर ग्रामपंचायतीचे अकाऊंट काढले नसतील त्यांनी अकाऊंट काढणे.
2. माझी वसुंधरा अभियान कालावधी मध्ये मिडियावर पंचमहाभूताशी संबंधित दररोज किमान एक पोस्ट टाकावी व ती पोस्ट ग्रामस्थांकडून जास्तीत जास्त शेअर करण्यात यावी तसेच फॉलोअर्स व सबक्रायबर यांची संख्या वाढविणे.
3. माझी वसुंधरा अभियान संकेत स्थळावरुन ग्रामपंचायतींमधील नागरिकांकडून वैयक्तिक आणि सामुदायिक ईप्लेज- घेणे.
4. ग्रामपंचायतीनी प्रत्येक महिन्यामध्ये खाजगी कंपन्या, स्वयंसेवी संस्था, कार्पोरेट शिक्षण संस्था, नागरिक सोसायटी गट करिता स्पर्धा, जनजागृती मोहिमा या सारखे उपक्रम राबविणे.
5. पर्यावरणाशी संबंधित दिवशी दर महिन्याला किमान एका कार्यक्रमाचे आयोजन करणे.

- **हरित शपथ (Earth Pledge म्हणजेच #Epledge):** हरित शपथ https://majhivasundhara.in या वेब पोर्टलवर Take your Epledge now येथे अथवा #Epledge येथे क्लिक करुन ग्रुपने अथवा वैयक्तिकरित्या घेण्याची तरतुद करण्यात आली आहे. ई-प्लेज व त्याअनुषंगाने केलेली ईप्लेजची- पूर्तता (वैयक्तिक व सामुहिक( या आधारावर गुण देण्यात येणार आहे.